## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष

## निशाणी क्र.१०

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – संजय नामदेव पाटील,

वय – ५० वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – विखरण, ता. शिंदखेडा, जि. धुळे

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी. पी. चव्हाण यांचे मार्फत.**

०१. दिनांक ०६.०६.२०१८ रोजी मी ११ ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान विखरण येथे होतो. त्यावेळेस मला जाधव नावाच्या पोलीसाने फोन केला व मी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे बोलाविले. त्याप्रमाणे मी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे गेलो. त्याठिकाणी त्यांनी मला एका कागदावर सही करण्यास सांगितली. त्या कागदावर काहीही लिहिलेले नव्हते. मी कोठेही पंचनाम्याकरीता गेलो नव्हतो. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर अ. क्र. १ कडील सही माझी आहे. मला पंचनाम्यातील मजकुराबाबत काहीही माहिती नाही. (करीता घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदाराच्या सहीपुरते **नि. क्र. ११** देण्यात येते. )

(सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतली. तशी अनुमती देण्यात येते.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०६.२०१८ रोजी मी व पोलीस असे दोंडाईचा ते सोनगीर रस्त्यावर मांडळ गावचे शिवारात हॉटेल साईप्रसादचेसमोर रस्त्यावर अपघाताचा घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी

पोलीसांनी दिसत्या वस्तुस्थितीप्रमाणे माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा मला वाचुन दाखविला असता तो बरोबर असल्याने मी त्याच्यावर सही केली होती. मी आरोपी प्रमोद लोटन पाटील यांस ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस ओळखतो व त्याला वाचविण्याकरीता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचे मार्फत.**

**उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.11.08 17:40:28 +0530

दिनांक : ०८/११/२०२४ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - गणेश साईनाथ अहिरे |
| न्यायालयाचे नांव | - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - ०८.११.२०२४ |

स्वाक्षरित/-

लघुलेखक (श्रेणी-३)